■

# कर्जफेडी

सूर्य क्षितिजाला जाण्यासाठी हळूहळू पश्चिमेला आपले अंग लोटू लागला. दुरून परतणाऱ्या चिमण्या-पाखरांच्या किलबिलाटानं सारा आसमंत भरून निघाला. वडा-पिंपळावर होणारा पाखरांचा किलबिलाट अंधारमय भयाणतेची जाणीव करून देऊ लागला. इतक्यात भिमानं बैलजोडी आणि दोन गायी गावाबाहेरच्या वस्तीतील घरापुढच्या अंगणात उभ्या केल्या. थोड्या वेळ थांबून त्यानं गायींना अंगणातील खुट्याला बांधलं. ओसरीमध्ये थंडगार पाण्यानं घंगाळ भरली होती. दिवसभराच्या घामानं अंगाला कुबट वास सुटलेला. ओसरीमध्ये आडोश्याला होऊन त्यानं कपडे काढले आणि मोठ्या गडव्यानं घंगाळीतलं पाणी घेऊन आंघोळ आटोपली. त्या पाण्यानं अंगाला थंडी तर झोंबलीच परंतु शरीरातील दिवसभराचा थकवा क्षणार्धात नाहीसा झाल्यागत वाटलं.

रायीनं अंगणात खाट टाकून ठेवली. त्या खाटेवर त्यानं अंग लोटलं. दिवसभर काट्याकुट्यातून चालून चालून पाय सारखे रचरच करीत होते. थोड्या वेळ त्याने आपलेच पाय हाताने दाबले. बरं वाटलं. खाटेवर पडताच स्वर्गसुख मिळाल्याचा



Scanned with CamScanner

भास क्षणभर त्याला झाला. इतक्यात एक थंडगार वाऱ्याची झुळूक वाहात गेली आणि अंग थरथरताच तो पुन्हा भानावर आला. डोकं बसल्याजागीच गरगर फिरू लागल्यासारखं वाटलं. इतक्यात रायी एका हातात पाण्याचा गडवा आणि दुसऱ्या हातात चहाची कपबशी घेऊन त्याच्यापुढं उभी झाली. त्यानं पुढं उभ्या असलेल्या बायकोवर नजर टाकली. आणि पुन्हा खाटेवरच झोपण्यासाठी डोळे बारीक केले. हे पाहून गडवा आणि चहा पुढं करीत म्हणाली, 'आवं...आवं-ओ धनी...आवं च्या घ्याकी...झोपले की काय म्हणायचे?' तीन-चार वेळा तिनं आवाज देताच तो भानावर आला. डोळे उघडले. क्षणभर तीला देव पावल्यासारखं वाटलं. भीमा खाटेवर पडल्यापडल्याच त्या कल्पनेच्या निवांत एकांकातून, 'हं..हं.. घेतो घेतो मी च्या' म्हणत उठून बसला. हात पुढं करून चहा आणि गडवा घेतला. गडवाभर पाणी पहिल्याचा गटागटा करीत घशाखाली ओतलं. गडवा बायकोच्या हातात दिला आणि कपातील चहा बशीत टाकीत फुरके मारून पिऊ लागला.

रायी देवदत्तासारखी कमरेवर हात ठेऊन त्याच्यापुढं उभी होती. त्यानं चहा पित रायीला विचारलं, 'काये, तो बिनबुड्या..बिना अवलादीचा...कर्जाच्या व्याजावर बायकोचे पोट भरणारा राजाराम सावकार आलता काये पैसे मांगायले... आपल्यावरच्या कर्जाचे?' तसा तिनं डोक्याला ताण दिला आणि एकदम आठवल्यागत म्हणाली, 'व्हय जी.. दुपारच्याला आला व्हता.' चहाचा रिकामा कपबशी तिच्या हातात देत तो म्हणाला, 'आरे बापरे...बरं..मंग तू काय म्हणाली?' 'मी बायीची जात. मी काय म्हणणार...? धनी वावरात गेला हाये म्हणाली ढोरं चारायले!' शांतपणे हातवारे करीत ती भीमाला सांगू लागली. 'बरं आणखी काई म्हणला न्हाई नं त्यो सावकार!' असं विचारताच तिनंही, 'जमलच तर रातच्याला एकादी चक्कर टाकीन म्हणाला' असं उत्तर दिलं. 'च्यायला हे सावकाराचं भूत... व्याजासकट व्याजाचे पैसे वसूल केल्याबिगर मह्यी नरडी सोडणार न्हाई म्हणायचं... सालं आपली गत दैव गांडू आन् कोणासंग भांडू अशी होऊन गेलीया.' थोडा हळू आवाजात तो तिच्यापुढं पुटपुटला. पण त्याचे बोलणे स्पष्टपणे रायीच्या कानावर गेले.

आपला नवरा जवळ पैसा नसल्यामुळे अस्वस्थ झाल्याचं तिन ओळखलं. तेव्हा दिलासा देत ती त्याला म्हणाली, 'आवं, येवळं कशास्नी टेंशन घेता तुमी कर्जाचं... फेडू की आपन पैसे जमा व्हईल तेव्हा आपल्यापरीनं.' तिचं ऐकून घेत तो म्हणाला, 'आवं, तुव्ह म्हणणं बरोबर हाये.. पण त्यो सावकार थांबणार का असा पैसे वसूल केल्याबिगर?' मध्येच तिनं, 'का.. काऊन न्हाई थांबणार...? त्यो व्याज घेवून ऱ्हायला न आपल्यापास्नं.... फुकट न्हाई देल्ले पैसे!' असं बोलत तोंड



Scanned with CamScanner

खुपसलं. तेव्हा तिला जुनी आठवण काढून देत तो बोलला, 'तसं न्हाई बाई... सा मैन्याची मुदत देल्ली होती त्यानं कर्ज फेडण्यासाठी आपल्याले...आन् आता.. सातवा मैना सुरू झालाय...आपली तर वावरातल्या पिकानं जिंदगानीच सतरा लुगडी, तरी मी उघडी असी करून ठेवलीया. कुठूनशान आनावा येवळा पैसा...?' त्याच्या डोळ्यात पाणी आलं. तिनं त्याचे डोळे पुसत विचारलं 'किती पैसे झाले म्हणायचे त्या सावकाराचे?' गळ्यातलं मंगळसुत्र काढत ती त्याला म्हणाली. तेव्हा मनोमन विचार करीत तिच्याकडे पाहत तो म्हणाला, 'मुद्दल पन्नास हजार आन् व्याजाचे तीस हजार... म्हंजी लाखाले इस कमी झाले बघ. कसं करावं थेस समजून न्हाई ऱ्हायले मले' त्यानं सांगितलेल्या आकड्यानं तिचा चेहरा पांढराच पडला. आठ-दहा हजाराचं मंगळसूत्र यावेळी कोणत्याच कामाचं न्हाई याची तिच्यासकट त्यालाही जाणीव झाली होती. ती डोळ्यात आसवं आणित म्हणाली, 'आवो धनी.. तुमी असे टेंशन नका घेत जावू... तुमच्या टेंशननं मह्यी छाती धडधडतीया' 'मंग मी काय करू राये... कशी करू पैशाची सोय? सारी सोंगं आणता येतात पण ह्ये सोंग न्हाई जमत' तिच्याकडे पाहतांना कपाळावर हात ठेवित तो बोलला.

थोड्या वेळ दोघेही शांत झाले. भिमानं आकाशात नजर फेकली. चांदण्या आभाळभर चमकत होत्या. पुन्हा त्या स्तब्ध वातावरणात तिच्याकडे पाहात तो म्हणाला, 'तेरवालाच बाची ऐरवी झाली आन् हे सावकाराचं लचांड मांगं लागलं. हे लचांड कसं दूर करावं तेस समजत न्हाई. समद्या डोस्क्याचा भुरका झाल्यासारखा वाटतो' एवढ्यात युक्ती सुचल्यागत रायी दबक्या शब्दात म्हणाली, 'तुमी रागावणार नसाल तर येक उपाय सांगू का म्या' 'उपाय आन् तू सांगणार.. सांग कोन्ता?' तिला प्रश्न करीत तो म्हणाला. तेव्हा तिनं, 'रात्रंदिवस येवळं टेंशन घेण्यापरीस रानाला लागलेली पाच एकराची बारी गिराईक पावून इकून टाका की! सावकाराचं लचांड कायमचं खतम होईल. ह्या कर्जामुळं लांडग्याम्होरं बकरी बांधून ठेवल्यागत अवस्था झालीय बघा तुमची. आणीक असं किती दिस भेतभेत जगायचं आपुन?' असं म्हणताच त्याला ते पटलं. परंतु मनातील शंकेचं निराकरण तिच्याजवळ करण्यासाठी तो म्हणाला, 'तुजं म्हणणं मले पटते राये, पण आजच्याला पाच येकराची बारी इकून येकट्या थडीवर चार पोटं न्हाई भरायचे आपले. आणि समज, उद्या ह्या पाच येकराच्या थडीतली पाऊस-पाणी कमी आला आन् न्हाई पिकलं म्हंजी? पिक पाणी काई आपल्या हातचं हाये व्हय?' 'व्हय, ते बी खरच हाये की', त्याच्याकडे पाहात ती मान हलवित बोलली. क्षणभर आपण सुचविलेला उपाय कामी पडला नाही म्हणून नाराज झाली.

थोड्या वेळ भिमा खाटेवर तसाच शांत बसून राहिला. वातावरणात



Scanned with CamScanner

सुटलेल्या थंडगार वाऱ्याला छेद देत तो चिडून म्हणाला, 'बानं वावरासाठी राजाराम सावकाराकडून पन्नास हजाराचं कर्ज घेतलं आन् आता तो सवाईनं पन्नासाचे अंशी हजार हेबाडतोया आपल्या ढुंगणातून' 'मंग हे सावकाराले तुमी का न्हाई समजावून सांगत?' त्याला शांत करण्याच्या इराद्याने ती बोलली, तेव्हा त्यानच 'आवं माय माजे... येळी का खुळी तु? बाचे आंगठे हाये नव्हं त्याच्यापासी असलेल्या कोर्ट स्टॅम्पवर' अशा स्पष्ट शब्दात समजावित तिला शांत केलं. सासऱ्याचा उल्लेख केल्यानं तिला एकदम घरातल्या म्हाताऱ्या सासुबाईची आठवण झाली. 'बरं बरं... आता थांबवा हा विषय... उद्याला पाहु... पह्यले जेवन आटोपून घ्या लवकर न्हाईतर पुन्हा सावकाराचं बोलावणं यायचं तुम्हास्नी' म्हणत त्याला खाटेवरून उठण्यासाठी आग्रह करू लागली. तेव्हा त्यानं, 'पोरांचं आण् मायंच् जेवन झालं का?' म्हणून तिच्याजवळ चौकशी केली. तेव्हा तिनं, 'आज बस्तरवार होता नव्हं मायचा. आत्ताच सोडला बगा उपास त्यांनी.' 'बरं बरं.. मांड पाट.. मी बैलाले कडबा टाकून येतो कोठ्यातून' म्हणत तो उठला. सांदीतून गोठ्यात गेला. तिथे रचलेल्या कडब्याच्या चार पेंढ्या पायाखाली ठेवून मोडल्या आणि गायीबैलांना टाकल्या. साऱ्या जनावरांच्या पाठीवरून मायेनं हात फिरवला आणि पाटावर जाऊन बसला. रायीनं ताटाजवळ पाण्याचा गडवा आणून ठेवला. म्हातारी माय बाजंवर आंग टाकू लागली. बाजुलाच दोन्ही नातू झोपला होते. म्हातारीनं त्यानाही पांघरून दिलं.

भिमानं ताटावर बसून भाकरीचा पहिला घास तोंडात टाकला. तोच चामडी चपला पायात टाकलेला सावकाराचा गडी संबा त्याच्या दारावर येऊन धडकला. हवेच्या झुळकीनं त्याच्या कपड्यांवरील अत्तराचा गंध त्यांच्या नाकापर्यंत आला. इतक्यात दारावरूनच, 'भिमा, हाये कारे घरामंदी?' असा खणखणीत आवाज दिला. त्या आवाजानिशी भिमा चवताळून दारावर आला आणि 'काय रे संबा, काय काम हाये, धड चार सुखाचे घास बी पोटात घालू देत न्हाई' म्हणत आपला राग काढू लागला. तेव्हा त्याच्याकडे पाहात संभानं, 'आता मह्यावर कायले रागावते बा तू. आमी आदेशाचे नौकर. सावकारानं वाड्यावर बोलावलं म्हणून निरोप द्यायला सांगितला' असं मोठेपणाच्या आविर्भावात टोला हाणला. 'बरं...पन् सावकारच इकडं चक्कर मारणार होता न...जमलं तर येईन म्हणावं थोड्या येळानं' असं भीमा म्हणताच, 'जमलं तर न्हाई... आत्ताच.. आन् सावकार कशाले येईन... व्याजाचे पैसे सावकारानं घेतले का तुमच्याकडून की तुम्ही घेतले त्यांच्याकडून... असली शिरजोरी सावकाराजवळ खपायची न्हाई' मोठेपणाचा आव आणीत संबा बोलला. भिमानं नमतेपणा घेत डोक्यात आलेला राग पोटात घातला. 'ठिक हाये, जेवण आटोपून नक्की येतो म्हणावं सावकाराला... सालं ह्या कर्जफेडीनं आपली



Scanned with CamScanner

खिशात न्हाई आना आन् मले बाजीराव म्हणा अशी गत करून ठेवलीया बापाच्या चुकीमुळे.' असं संबाला उद्देशून म्हणताच संबा मान हलवित आल्या पावलानिशी काठीचा आधार घेत निघून गेला. सावकाराच्या घराकडं जाणाऱ्या गावरस्त्यानं अंधारात तो दिसेनासा झाला. तो आलेल्या दिशेनं गावातील कुत्र्यांचं भुकणं चालूच होतं. बाहेर अंधारात अध्येमध्ये काजवे चमकत होते.

भिमा पुन्हा ताटावर बसला पण आतून मात्र थोडा खचला होता. तेवढ्यात आतून येत रायीनं त्याला प्रश्न केला, 'कोण व्हतं जी ? आण् कश्याले आला व्हता ह्या येळला ?' तोच भिमा मानेला झटका देत म्हणाला, 'आत्ता ह्या टायमाला दुसरं कोन येणार आपल्या दारावर सावकाराच्या गड्याशिवाय. त्यानं वाड्यावर बलावलं म्हणून सांगाले आला व्हता संबा.' 'आवं बया, आता ह्या टायमाले... हाऊ द्या.' 'मी न्हाई गेलो त रातभर सावकारबी झोपणार न्हाई सुखानं आन् मलेबी झोप नाई यायची चिंतेनं.' 'पिढ्यांचं लुटणं आन् जन्माचं हासणं सावकाराच्या आंगोपांगी भिनलं हाये नव्हं. या अंधाऱ्या वक्ताले जाण्यापरीस सकायी येतो म्हणायला काय जात व्हतं तुमचं ?' त्याला समजावणीच्या सुरात ती बोलली. तेव्हा भिमा चिडून बोलला, 'आता बयताडे, तु म्हले जास्तीचं सांगत बसू नोको. पह्यलेस त्यानं डोस्क्याचा भुसा केला आन् आता तू... रातभर टेंन्शन घेण्यापरीस भेटून आलेलं बर न्हाई का सावकाराले ?' ती दबक्या आवाजात त्याला कशीबशी 'हो...हो... बरुबर हाये तुमचं' म्हणत पुन्हा चिडीचुप झाली. म्हातारी माय झोपेतून जागी झाल्यागत तीला वाटलं. पुन्हा शांत होत त्यानं ताटावर बसून दोन भाकरी खाल्ल्या आणि जेवण आटोपलं. ताटात हात धुवून तसाच उभा झाला.

खाटेवरील गोधडीला हात पुसला आणि खुंटीवर अडकवलेलं शर्ट अंगात चढवलं. बाजुलाच अडकवलेला कंदिल आणि दरवाज्यामागची काठी हातात घेत तो तिला म्हणाला. 'झोपा आता तुमी शांतपणानं. मी जाऊन येतो तासाभरात सावकाराच्या वाड्यावरून.' तोच ती म्हणाली, 'कंदिलामंधी उलीसं तेल हाये. सावकाराच्या घरी जायीपास्तोर पुरणार न्हाई तेल.' 'बरं... ऱ्हाऊ दे कंदिल' म्हणत तो कंदिल त्यानं तिच्या हातात देऊन रस्ता चालू लागला. गाववस्तीत घुसला. अंधारात चालताना त्याच्या पायातील आवाजानं आडोश्याला झोपलेली कुत्री जागी होऊन भुंकायला लागली. परंतु त्याची त्याला पर्वा नव्हती. दहा मिनिटात अंधाराला कापीत तो वाड्यावर आला. आडदांड भिमाला पाहताच एका गड्यानं तो आल्याची बातमी सावकारापर्यंत पोहचवली. तेव्हा तो दारात असल्याची खात्री करून आतूनच सावकारानं, 'आला कारे भिम्या. ये आतमंधी... आन् असं किती वेळा बोलवायचं तुम्हाला आम्ही ?' म्हणून आवाज दिला. म्हशीचे दुध काढताना



Scanned with CamScanner

करनेवाला मोठा गुन्हेगार असतो. म्हणून आपण अन्यायाचा प्रतिकार केला पाहिजे. आपलं जीवन कोणता देव आणि धर्म बदलवणार नाही किंवा आमच्या तळहातावरील रेषाही बदलवणार नाही. ते आम्हीच बदलवलं पाहिजे.' भिमाच्या कानावर एकेक शब्द पडला. त्यानं स्वत:च विचार केला. आतून तो पूर्णपणे पेटून उठला. शरीरात आत्मविश्वासाची आणि क्रांतीची एक नविन ताकद आल्यासारखे त्याक्षणी त्याला वाटले. मनातल्या भितीऐवजी जगण्याची ऊर्जा उरात पेटल्यासारखे वाटू लागले. अंगात ताकद संचारल्याचा त्याला भास होऊ लागला.

वस्तीच्या दिशेने दणादण पावल टाकीत तो घरी आला. रायी त्याची दारावर वाट पाहात उभी होती. सावकारानं दोन दिवसात बैलजोडी विकण्याची दिलेली धमकी एकसारखी त्याच्या मस्तकात फिरत होती. घरात येऊन खाटेवर बसताच रायीनं चौकशी करीत विचारलं 'काय म्हणाला वो धनी त्यो सावकार? आन् येवडा वकत कावून लागला तुम्हाले घरी परतायले?' दीर्घ उसासा टाकीत तो म्हणाला, 'भडवा, तालुक्याच्या जत्रेला बैलजोडी इकायसाठी संभ्याले घेवून जा म्हणायला उद्याला. त्याच्या बापानं घेतली का बैलजोडी कधी जत्रेमंदी इकायला? साल्याले, उभा कापतो गावामंधी चारचौघासमोर' त्याच्या तोंडचे हे शब्द ऐकून रायी थंडगार पडली. तीला आता त्याच्यासमोर काय बोलावं तेच सुचेना. ती घरात जाऊन शांतपणे झोपी गेली. बराच वेळ तो एकटाच खाटेवर बसून विचार करू लागला. 'आजवर भेकडासारखं जगत आलोय आपण म्हणूनच तर सावकार दम देतोय आपल्याला. मनात येईल तसं बोलतो. मायबापाच्या नावानं शिव्याशाप देतो. आन् आपण हाजी हाजी करत त्याच्या मागं मागं कुत्र्यासारखं जगत राहतो. आपल्या पिढ्याबी अशाच जाणार. असं डोळ्यात केर असतांना कानात फुंकर घालून जगणं उपयोगाचं नाही. हे कुठीतरी थांबलं पाह्यजे गड्या; न्हायतर आपून माणूस न्हाई.' बाहेर सोसाट्याचा वारा सुटला होता आणि आत त्याच्या डोक्यात बाबासाहेबांच्या विचारक्रांतीचा वारा धगधगत होता. शेवटी बऱ्याच रात्री कधी त्याला झोप लागली ते कळलेदेखील नाही.

चिमण्यांच्या किलबिलाटानं पहाट झाली. रात्री सावकाराच्या घरी गेल्यानंतर घडलेली सारी हकीकत भिमानं माय आणि रायीजवळ कथन केली. दोन्ही पोरं अद्याप उठली नव्हती. भिमा शेतातला कामधंदा सोडून संभा आपली बैलजोडी जत्रेत नेऊन विकेल या भितीनं घरीच राहिला. संबा बैलजोडी न्यायला आलाच तर त्याच्याशी दोन हात करायची त्यानं पुरेपूर तयारी केली होती. मनानं तो आता धिट झाला होता. दिवस मावळून संध्याकाळ झाली परंतु संभा मात्र आलाच नाही याचं त्याला आश्चर्य वाटलं. खरं तर तोही सावकाराच्या कर्जाच्या बळीचा



Scanned with CamScanner

सोय कर बाबा. आधीच माही तब्बेत बरोबर राहात नाही' त्यांच्या शब्दानं तो पुरता गोंधळून गेला. उठून सावकाराचा गळा पिचकावा आणि जीव घेऊन कायमची कटकट संपवावी असं त्याला वाटलं. पण पुन्हा घरचा विचार आला. या विचारातून भानावर येत, 'दोन दिवसात...आन् असं एकाएकी...येवड्या लवकर कशी होईल पैश्याची सोय. पैसे काई घरच्या झाडाला लागतेय का सावकार?' असा दबक्या आवाजात केलेला प्रश्न सावकाराच्या कानावर स्पष्टपणे गेला. आता रागानं दम टाकीत तो म्हणाला, 'हे बघ भिम्या, ते तू आम्हाले काही सांगू नोको. संभ्या... भिम्याची बैलजोडी उद्या तालुक्याच्या जत्रेमंधी नेऊन लाखाले विक. म्हंजी भिम्याचं सारं कर्ज व्याजासकट फिटेल. बैलजोडीचे पैसे भिम्याच्या हातात देऊन वाड्यावर घेऊन यायचं याला; पैश्यासकट समजलं' बाजुला त्यांच्या आज्ञेची वाट पाहात उभ्या असलेल्या संभ्यानं मान हलवित होकार दिला. तेव्हा भिमा पुढं सरकत त्यांना हात जोडून विनवणी करीत बोलला, 'माजं उभं पिक वावरात हाये. आवताबिगर जमायचं न्हाई आमचं. सुगीच्या पिकाचे पैसे हातामंदी पडले का पहिल्यांदा तुमची कर्जफेडी करतो म्या' त्याच्या बोलण्यानं सावकार पुन्हा भडकून उठला. 'साले, सरकारचे आता नवनविन कायदे बनून राहिले. सावकारीवर बंदी आली. एखादा कर्जबाजारी शासनाकडं गेला तर तुरुंगात जायची पाळी यायची. तवा पाय बाबा भिमा, उद्या तालुक्याच्या बाजारात बैलजोडी विक आन् परवा पैसा हातात पडल अशी सोय कर. आन् जा तू आता घरला.' सावकाराचं बोलणं संपताच भिमा शांतपणे पावलं माघारी घेऊन घराची वाट चालू लागला. प्रत्येक पावलागणित आपल्या शरीरातून ताकद कमी होत असल्यागत त्याला वाटू लागलं. थोड्या थोड्या वेळानं तो मागे वळून सावकाराच्या वाड्याकडे पाहू लागला. माघारी फिरावं आणि वाड्याला एकदाची आग लावावी असेही वाटले. संकटे हत्तीच्या पायी येतात आणि मुंगीच्या पायी जातात याची जाणीव भिमाला झाली. त्याच्या डोक्यात राग शिरला होता. कुत्र्यांचं वाड्याकडे नजर टाकीत भुंकणं सुरू होतं.

गाववस्ती ओलांडून तो आपल्या वस्तीत शिरला. येतांना मधल्याच चौकात बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणाचा बौद्धिक कार्यक्रम चालला होता. जिल्ह्याच्या ठिकाणावरून आलेले साहित्यिक पोटाच्या बेंबीला ताण देऊन जोरजोराने भाषणे देत होती. साऊंडवर कुणीतरी पाहुणा एकसारखे बोलत होता, 'बाबासाहेबांनी आम्हाला वाघ होऊन जगण्याचा संदेश दिला. आमच्यातला आत्मसन्मान जागृत केला. परंतु खरच आम्ही आत्मसन्मानाने जगतो का? आमचा जन्म कशासाठी झाला? सावकाराचे व्याजाने पैसे घेऊन मांजरासारखे जगायचे हेच शिकवले का बाबासाहेबांनी आपल्याला! लक्षात ठेवा, अन्याय करणाऱ्यापेक्षा अन्याय सहन



Scanned with CamScanner

आधी आचळाला दुध लावावे लागते त्यांच्या आवाजात गोडवा होता. त्यांच्या गोडीनं बोलण्यामागील अर्थ त्याच्या लक्षात आला. भीमा आत जाऊन बसला. सावकार बंगईवर बसून अडकित्याने सुपारी बारीक करीत बसलेला. भिमाची नजर सावकाराच्या हातातील अडकित्यात सापडलेल्या त्या सुपारीकडे गेली. आपलीही अवस्था त्या सुपारीसारखीच झाल्याचे त्याला जाणवले. इतक्यात सावकारानं त्याला चौकशीच्या सुरात विचारलं, 'हं..भिमा.. काय म्हणते पिकपाणी?... आरे असा खाली बस की शांतपणे..सहज खात्याची वही पाहतांना आठवण आली म्हणून बलावलं तुले..तू आम्हाले विसरला असशील पण आम्ही तुला विसरून कसं चालेल?' त्यांचे शब्द भिमाच्या अंत:करणाला झोंबले पण काय करणार? अडला हरी गाढवाचे पाय धरी. तो शांतपणे मांडी घालून बाजूला बसला.

बाजुलाच जुन्या कागदांचा एक गठ्ठा पडलेला. सावकारानं टेबलावरील कर्जाच्या स्टॅम्पपेपरवर नजर टाकली. बायकोला आवाज दिला. तिनं ते स्टॅम्पपेपर त्याच्या हातात दिले आणि लगेच घरात निघून गेली. दोनशे एकराचं रान असणाऱ्या राजाराम सावकाराला मागंपुढं कुठीच नव्हतं. एकेक स्टॅम्पपेपर हातात घेऊन तो निरखून पाहू लागला. मनातल्या मनात काहीतरी गणित करून तो स्टॅम्पपेपर बाजुला ठेवीत होता. एक स्टॅम्पपेपर हातात घेत तो म्हणाला, 'भिमा, मागच्याच महिन्यात सहावा पूर्ण झाला. आता व्याजाची रक्कम वाढवावी लागणार गड्या नाइलाजानं. सहा महिन्यात व्याजाचा आकडा लाखावर जाणार. तवा कसं करायचं म्हणतो मी?' मी न्हाई त्यातली आन् कडी लावा आतली अशी भूमिका त्यानं घेतल्याचं भिमाला दिसलं पण इलाज नव्हता. तरीसुद्धा ठामपणाची भूमिका घेत, 'मी तरी काय करू सावकार... एक वावर पुरात जाते आन् एक उरात जाते' असे नमतेपणा घेऊन सांगू लागला. तेव्हा सावकारानं, 'मंग अश्यानं तू आमचं कर्ज केव्हा आणि कसे फेडणार? की अशीच चालढकल करणार... बरं पैसे पचवायचा विचार तर नाही आहे ना तुझ्या मनात!' असं फिरकी घेत विचारताच, 'न्हाई न्हाई सावकार.. ह्या वरीस जमलं न्हाई कर्ज फेडायचं. पुढच्या वर्षाला पूर्ण फेडतो बघा मी' असं विश्वास दाखवित तो सांगू लागला. त्यावेळी, 'तुव्हा बाभी असाच म्हणत व्हता माझ्याजवळ. आन् शेवटी काय झालं..? माझं कर्ज सोडून वरच्याचं कर्ज फेडायला गेला कायमचा!' म्हणत त्यांनी जुनी आठवण काढली. लगेच भिमानं 'जे व्हायचं ते झालं. त्याला मी काय करणार?' म्हणताच बापाच्या आठवणीनं त्याच्या डोळ्यात पाणी आलं. पण त्याच्या डोळ्यातील पाण्याशी सावकाराचा काय संबंध?

सावकारानं थोड्या वेळ विचार केला आणि भिमाला तंबी देत म्हणाला, 'ते काही नाही.. मह्याच्यानं पुन्हा वर्षभर नाही थांबनं होत. दोन दिवसात तू पैश्याची



Scanned with CamScanner

बकरा ठरलेला होता. त्याची तीन एकराची पडीत जमिन त्यांच्याकडे गहाण होती. 'सावकारानं कर्जाचे पैसे मागू नये' या भितीनं तो त्यांच्या आज्ञा मानीत होता.

संध्याकाळ झाली. जेवणं आटोपून झोपी जाणार तोच दारावर संभा आला. सुस्कारा टाकीत खाटेवर बसला. सावकारानं आपल्यावर केलेल्या अन्यायाचा तो पाठच वाचू लागला. भिमाएवढाच तोही आतून पेटून उठला होता. घरातले सारेच झोपी गेले. मात्र ते दोघे बाहेर बराच वेळ बसून दबक्या आवाजात गोष्टी करीत होते. बाहेर हवा सुटली होती. बऱ्याच वेळांनी तो 'मी, करतो पण गोष्ट कुठं फुटता कामा नये' म्हणून भिमाचा निरोप घेऊन निघून गेला.

पहाट उजाडली. सावकाराच्या वाड्याजवळ राहणाऱ्या सदाशिवनं रात्री वाडा पेटून भस्मसात झाल्याची बातमी गावभर केली. वाड्यातील सावकार आणि बायकोची सामानांसह राखरांगोळी झाली होती. त्या भग्न वाड्यात दोघांची हाडे तेवढीच शिल्लक होती. भीमा आणि संभाही भरल्या डोळ्यानं हे सारं पाहात होते. पोलिसांनी येऊन पंचनामा केला. मात्र त्यात काहीच निष्पन्न झालं नाही. ते आल्या पावलानं गाडीतून माघारी परतले. वाड्यातील सावकारानं आजवर जपलेल्या कागदपत्रांचा धूर तेवढा वाऱ्याच्या झुळकेनं चौफेर पसरत होता. रात्रीच्या वाड्याला लागलेल्या एका आगीनं सारं गाव कर्जफेडीतून मुक्त झालं होतं.

Scanned with CamScanner